# भारतीय जनता पक्ष

(केंद्रीय कार्यालय)
11, अशोक रोड, नवी दिल्ली-110001
फोनः 23005700, फॅक्सः 23005787


**भाजपचे खासदार आणि राज्यसभेतील विरोधी पक्षाचे उपनेते श्री रविशंकर प्रसाद यांचे निवेदन**

## सरकारमुळे उद्भवलेल्या समस्येवर कोणतेही उत्तर नसल्याने राहुल गांधी हे खोट्या इतिहासांचा आश्रय घेत आहेत.

2014 च्या निवडणुका या वाढती बेरोजगारी, 4.7% असा तळाला गेलेला देशाचा विकासदर, बेफाम वाढणारी दरवाढ, बोकाळलेला भ्रष्टाचार, जनतेच्या पैशांची लूट, देशातील असुरक्षिततेचे वातावरण वगैरे मुद्द्यांवर लढताना दिसून येत आहे. त्यामुळे देशात निराशाचे वातावरण आहे. भारताची प्रतिमा खराब झाली आहे जे आपल्यासाठी दुर्दैवाचे आहे. संपूर्ण भारतातील लोक आता त्यात संपूर्णपणे बदलाची आशा राखत आहेत. राहुल गांधी या सर्व समस्यांचे उत्तर देऊ शकत नसल्याने ते देशाचे लक्ष अन्यत्र वळविण्यासाठी संपूर्णपणे खोटे आणि बालिश आरोप करत आहेत, ज्यात महात्मा गांधींच्या हत्येत आरएसएस सामील असल्याचे त्यांनी वक्तव्य केले आहे. श्री राहुल गांधी यांना ना इतिहासाची माहिती आहे ना त्यांनी भाषणासाठी होमवर्क केला आहे.

महात्मा गांधीचे नातू श्री राज मोहन गांधी यांनी “ सरदार पटेल- एक जीवन” हे जीवन चरित्र लिहिले आहे. या पुस्तकात पान क्र.472 वरील लेखात खाली दिलेल्या प्रमाणे नोंद आहे, जे जवाहरलाल नेहरु यांच्यासाठी सरदार पटेल यांच्या द्वारे लिहिलेले दि.27.02.48 च्या पत्रावर आधारित आहे:

“सरदार पटेल हे नेहरु यांना उद्देशून, दि. 27.2.48: मी बापु हत्या केस चौकशी संदर्भातील प्रगतिसाठी रोज संपर्कात आहे. मी संजीवी(गुप्तचर विभागाचे प्रमुख आणि आयजी, दिल्ली पोलिस) यांच्याबरोबर त्या दिवशी चर्चा केली होती. त्यांनी सर्व आरोपींचे विस्तारीत जबाब नोंदवून घेतले. आरोपींच्या जबाबावरुन स्पष्टपणे असे बोलू शकतो की आरएसएस हत्येमध्ये सामील नव्हती. ते षडयंत्र हिंदू महासभेच्या एका कट्टरतावाद्यांचे होते”

सरदार पटेल यांनी स्पष्ट रित्या सांगितले की आरएसएसचा हत्येमध्ये कोणताही हात नाही आणि त्यांचे निवेदन हे पोलिस तपासावर आधारित होते. साहजिकच आहे कॉग्रेस आगामी निवडणुकांत भयावह आणि निरुत्साही दिसून येत आहे, त्यामुळे पराजयाच्या भीतीने अशा प्रकारचे वक्तव्य करत आहेत.

कशासाठी जवाहरलाल नेहरु- इंदिरा गांधी यांच्या अनेक वर्षांच्या शासनकाळात सरदार पटेल आणि मौलाना आझाद यांना भारत रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले नाही?

राहुल गांधी आणि कॉग्रेस द्वारे खोटा इतिहास उभा केला जात आहे. कॉग्रेस पक्ष आणि त्यांचे नेते खास करुन राहुल गांधी यांनी हा प्रश्नं विचारण्याची वेळ आता निघून गेली आहे. सरदार पटेल आणि मौलाना आझादे दोघांनी देशासाठी त्यांचे जीवन समर्पित केले आहे. त्यांना भारत रत्न देणे पूर्णपणे योग्य होते. मौलाना आझाद 1959 साली तर सरदार पटेल यांचा 1950 साली मृत्यू झाला. जवाहरलाल नेहरु 16 वर्षे आणि इंदिरा गांधी यांनी 5 वर्षे शासन केले. राजीव गांधी हे 17 वर्षांसाठी पंतप्रधानपदी राहिले. या 38 वर्षात मोठ्या कालावधी दरम्यान श्री नेहरु आणि इंदिरा गांधी यांच्यासह अनेक राष्ट्रीय नेत्यांना भारत रत्न द्यायला हवा होता.

देशात दोन महान भारतीय- सरदार पटेल आणि मौलाना आझाद यांना श्री नरसिंह राव सरकारने भारत रत्न पुरस्कार दिला. श्री राव हे एकमात्र कॉग्रेसी पंतप्रधान होते जे नेहरु-गांधी परिवाराबाहेरचे होते. सरदार पटेल आणि मौलाना आझाद यांच्याबद्दल भेदभाव का करण्यात आला त्याबाबत भाजप, श्री राहुल गांधी यांच्याकडे उत्तर मागत आहे. तसे पाहता आज कॉग्रेस पक्षात गौरव आणि आदर मात्र एकाच परिवाराला मिळतो.

**(अरुण कुमार जैन)**
कार्यालय सचिव